International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No. 6 July-Aug 2024

# स्वातंत्र्यसैनिक सातगोंडा गिरगोंडा पाटील: अज्ञात भारतीय स्वातंत्र्यसैनिकाचा शोध

**प्रा. डॉ. ओलेकर प्रमोदकुमार अंकुश**
सहयोगी प्राध्यापक,इतिहास विभागप्रमुख,
आर्टस् अंड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता.- वाळवा, जि. सांगली.
**Corresponding Author: प्रा. डॉ. ओलेकर प्रमोदकुमार अंकुश**
**DOI- 10.5281/zenodo.13739338**

**गोषवारा:**

या शोधनिबंधात सातगोंडा गिरगोंडा पाटील, एक अज्ञात भारतीय स्वातंत्र्यसैनिक यांच्या जीवनाचा आणि योगदानाचा अभ्यास केला आहे, ज्यांना मुख्य प्रवाहातील ऐतिहासिक इतिहास लिखाणात अपेक्षित स्थान मिळालेले दिसत नाही, तरीही पाटील यांनी ब्रिटिश वसाहतवादी राजवटीपासून भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांची कहाणी अद्याप अप्रकाशित आहे. विस्तृत अभिलेखीय संशोधन, मुलाखती आणि प्राथमिक स्त्रोतांच्या विश्लेषणाद्वारे, या अभ्यासाचा उद्देश पाटील यांच्या जीवनावर, प्रेरणांवर आणि स्वातंत्र्य चळवळीवर झालेल्या प्रभावावर प्रकाश टाकण्याचा आहे. त्यांचा प्रवास उलगडून आणि त्यांच्या योगदानाचे परीक्षण करून, हा शोधनिबंध या विस्मृतीत गेलेल्या देशभक्ताला योग्य मान्यता देण्याचा प्रयत्न करतो आणि भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील अनेकदा दुर्लक्षित राहिलेल्या नायकांना मान्यता देण्याचे महत्त्व अधोरेखित करतो.

**मुख्य शब्द:** प्रजा परिषद, चलेजाव, संविधान सभा, प्रजासत्ताक

**प्रस्तावना:**

भारतीय स्वातंत्र्यलढा ही भारतातील ब्रिटिश वसाहतवादी राजवटीविरुद्धची ऐतिहासिक चळवळ होती. अनेक दशके चाललेल्या, लढ्यात असहकार,अहिंसक सविनय कायदेभंग, सामूहिक निषेध आणि सशस्त्र उठाव यासह विविध प्रकारच्या प्रतिकारांचा समावेश होता. महात्मा गांधींच्या प्रमुख नेतृत्वाखाली, हा लढा अखेरीस 1947 मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळविण्यात यशस्वी झाला.

सातगोंडा गिरगोंडा पाटील यांच्यासारख्या कमी-जाणत्या स्वातंत्र्यसैनिकास ओळखणे अनेक कारणांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्वप्रथम, याने भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे अधिक व्यापक आणि अचूक आकलन सुनिश्चित होते. पाटील सारख्या व्यक्तींच्या योगदानावर प्रकाश टाकून, आम्ही त्यांच्या चळवळीतील भूमिकांबद्दल अधिक सूक्ष्म दृष्टीकोन प्राप्त करतो. दुसरे म्हणजे, कमी-प्रसिद्ध स्वातंत्र्यसैनिकास ओळखणे प्रबळ कथांना आव्हान देण्यास मदत करते. याने स्वातंत्र्य संग्रामाच्या सामूहिक स्वरूपावर भर देता येतो, आणि भारताच्या स्वातंत्र्यासाठी अथक परिश्रम करणाऱ्या अगणित वीरांच्या प्रयत्नांची कबुली मिळते. शेवटी, या कमी ज्ञात स्वातंत्र्यसैनिकास ओळखणे ही ऐतिहासिक न्यायाची बाब आहे. हे सुनिश्चित करते की त्यांचे बलिदान आणि योगदान विसरले जाणार नाही, त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना योग्य मान्यता आणि आदर प्रदान केला जाईल. पाटील यांच्यासारख्या व्यक्तींवर प्रकाश टाकून, आम्ही भारताच्या स्वातंत्र्याच्या प्रवासाला आकार देणाऱ्या अनेक आवाजांचा आणि अनुभवांचा सन्मान करतो.

या शोधनिबंधाचे उद्दिष्ट सातगोंडा गिरगोंडा पाटील, एक अज्ञात भारतीय स्वातंत्र्यसैनिक यांचे जीवन आणि योगदान शोधणे आणि स्वातंत्र्याच्या लढ्यात त्यांच्या भूमिकेवर प्रकाश टाकणे हे आहे. पाटील यांची कथा, प्रेरणा आणि स्वातंत्र्य चळवळीवरील परिणाम उलगडून ऐतिहासिक ज्ञानातील पोकळी भरून काढणे हा या अभ्यासाचा उद्देश आहे. पाटील यांच्या सहभागावर प्रकाश टाकून, या संशोधनाचा उद्देश भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील कमी ज्ञात स्वातंत्र्यसैनिकास ओळखण्याचे महत्त्व पटवून देण्याचा आहे.

चळवळीत सहभागी झालेल्या वैविध्यपूर्ण व्यक्ती आणि त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल अधिक व्यापक समज प्रदान करण्याचा प्रयत्न करतो. अभिलेखीय संशोधन, मुलाखती आणि मौखिक इतिहासांद्वारे, हा अभ्यास पाटील यांच्या अकथित कथनाला समोर आणण्याचा प्रयत्न करतो, हे सुनिश्चित करतो की भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्याच्या व्यापक ऐतिहासिक संदर्भात त्यांचे योगदान स्वीकारले जाईल आणि त्यांचा सन्मान केला जाईल.

**संशोधन स्रोत आणि साहित्य:**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्व प्राथमिक माहिती सातगोंडा गिरगोंडा पाटील यांच्या जयसिंगपूर येथील स्नुषा श्रीमती प्रभा यशोधन पाटील –शिरगुरकर यांच्या कडून उपलब्ध झाली. पाटील यांच्या स्नुषा श्रीमती प्रभा यशोधन पाटील –शिरगुरकर यांना स्वातंत्र्यसैनिक सातगोंडा गिरगोंडा पाटील यांचा मोठा मौखिक स्वरुपात इतिहास ज्ञात आहे., वैयक्तिक दैनंदिनी, पत्रे, छायाचित्रे किंवा इतर संस्मरणीय वस्तू त्यांनी जतन करून ठेवल्या आहेत.ज्यातून पाटील यांचे जीवन, प्रेरणा आणि योगदान याबद्दल अंतर्दृष्टी मिळते. प्रस्तुत संशोधन हे त्यावर आधारित आहे.

**भारतीय स्वातंत्र्य चळवळ:**

भारतीय स्वातंत्र्य चळवळ हा भारतातील ब्रिटीश वसाहतवादी राजवटीविरुद्ध दीर्घकाळ चाललेला संघर्ष होता. यात महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील अहिंसक सविनय कायदेभंगापासून सशस्त्र बंडांपर्यंत अनेक पद्धतींचा समावेश आहे. राजकीय स्वायत्तता, सामाजिक न्याय आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळवणे हे या चळवळीचे उद्दिष्ट होते. दांडी मार्च, भारत छोडो आंदोलन, आणि असंख्य निषेध आणि मोहिमांनी लाखो भारतीयांना एकत्र केले. जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस, सरदार वल्लभभाई पटेल यांसारख्या नेत्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. अनेक दशकांच्या प्रतिकार आणि वाटाघाटीनंतर, अखेरीस 1947 मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले, वसाहती अत्याचाराविरुद्धच्या लढ्यात एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यादरम्यानचे राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरण तीव्र सक्रियता, वाढता राष्ट्रवाद आणि आत्मनिर्णयाच्या शोधाने चिन्हांकित होते. राजकीयदृष्ट्या, भारतीयांनी ब्रिटीश वसाहतवादी राजवटीला आव्हान देत अधिक प्रतिनिधित्व आणि स्वराज्याची मागणी केली. सामाजिक असमानता, जातीय भेदभाव आणि लैंगिक समानतेला चालना देण्याच्या प्रयत्नांसह सामाजिकदृष्ट्या, राष्ट्रीय चेतनेमध्ये वाढ झाली. सांस्कृतिकदृष्ट्या, संघर्षाने राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक म्हणून भारतीय कला, साहित्य आणि परंपरांचे पुनरुज्जीवन केले. स्वदेशी चळवळीसारख्या चळवळींनी स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन दिले, आर्थिक स्वावलंबनाला चालना दिली. एकंदरीत, स्वातंत्र्य, एकता आणि ब्रिटिश वर्चस्वाच्या विरोधात भारतीय वारसा जतन करण्याच्या सामूहिक आकांक्षेने वातावरण वैशिष्ट्यपूर्ण होते.

या परिस्थितीनेच स्वातंत्र्यसैनिक सातगोंडा गिरगोंडा पाटील सारख्या सामान्य तरुणांना स्वातंत्र्य चळवळीने आकर्षित केलेले दिसते. तरुण वयातच त्यांनी स्वतःला या चळवळीशी जोडून घेतल्याचे दिसून येते. भारतीय स्वातंत्र्या वेळची अशी परिस्थिती पाटील यांच्या सारख्या सर्वसाधारण जैन कुटुंबातील तरुणासाठी प्रेरित करणारी आणि स्वतःला काहीतरी सिद्ध करून दाखविण्यासाठी अनुकूल होती. ज्याचा त्यांनी स्वीकार् केला.

**सातगोंडा गिरगोंडा पाटील यांचे प्रारंभिक जीवन:**

सातगोंडा गिरगोंडा पाटील यांचा जन्म सामान्य जैन कुटुंबात पट्टणकोडी, ता. चिक्कोडी (कर्नाटक) येथे १९११ च्या दरम्यान झाला.[१] मुळचे त्यांचे रहिवाशी गाव चांद शिरदवाड हे आहे.[२] ते गिरगोंडा पाटील यांच्याकडे बालवयातच दत्तक गेले होते.[३] त्यांचे संगोपन आणि शिक्षण त्यांनीच केले. राजर्षि शाहूमहाराज यांनी त्याकाळात शिक्षणासाठी केलेल्या प्रयत्नामुळे सातगोंडा पाटील यांच्यासारख्या तरुणांना शिक्षणाची गोडी लागून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. ज्यामुळे त्यांना बडोदा संस्थानात महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्याकडे काम करण्याची संधी मिळाली.[४] या संधीचा त्यांना चांगला फायदा होऊन त्यांच्यावर महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा मोठा विश्वास राहिल्याचे दिसून येते. ज्यामुळे त्यांना कोल्हापूर संस्थानचे छत्रपती शाहूमहाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत स्नेह ठेऊन काम करण्याचा योग आला. त्यांनी याकाळात महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना बहुमोल सहकार्य केल्याचे दिसून येते.[५]

**सातगोंडा गिरगोंडा पाटील यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान:**

सातगोंडा गिरगोंडा पाटील यांनी सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग घेतला होता. बडोदा येथे असल्यामुळे ते महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली अहमदाबाद येथील साबरमती आश्रमापासून सुरु झालेल्या मिठाच्या सत्याग्रहापासून स्वतःला रोखू शकले नाहीत. दुसऱ्या गोलमेज परिषदेनंतर गांधीजीनी परत सुरु केलेल्या सविनय कायदेभंग चळवळीतील सहभागाबद्दल त्यांना अटक करून काही काळ येरवडा येथील कारागृहात ठेवण्यात आले होते. त्यावेळी त्यांना गांधीजींना भेटता आले होते.[६]

सातगोंडा पाटील यांचा मोठा सहभाग हा कोल्हापूर येथील प्रजा परिषदेच्या स्थापनेमध्ये होता. कोल्हापूर संस्थानात कॉंग्रेसला बंदी घालण्यात आल्यानंतर त्यांनी सहकार्यासोबत कोल्हापूर प्रजा परिषदेची स्थापना केली होती.[७] ही कृती सविनय कायदेभंग चळवळीशी अनुरूप होती. यामुळे त्यांना अटक होऊन, दोन वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा झाली. ते २२ डिसेंबर १९३९ ते १८ डिसेंबर १९४० या काळात कोल्हापूर प्रजा परिषदेची स्थापना केल्याबद्दल कळंबा कोल्हापूर येथील कारागृहात शिक्षेत होते.[८] या शिक्षेच्या काळात त्यांनी चांगले वाचन केल्याचे त्यांच्या दैनंदिनी मधील उल्लेखावरून लक्षात येते. ज्याचा फायदा त्यांना नंतर स्वातंत्र्य दृष्टीपतात आल्यानंतर राष्ट्रीय नेत्यांशी संवाद साधताना झाला.

सातगोंडा पाटील यांनी १९४२च्या चलेजाव चळवळीत सुद्धा आपल्या परीने योगदान दिले होते. त्यांनी भूमिगत स्वातंत्र्यसैनिकांना मदत केली. याकाळात ते

महाराजा सयाजीराव गायकवाड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सातत्याने संपर्कात होते.[९]

१९४६ च्या दरम्यान भारताला स्वातंत्र्य मिळणे दृष्टीपतात आले होते. याकाळात देशाला मिळणारे स्वातंत्र्य त्याचा आनंद आणि फाळणीचे शल्य त्यांच्या दैनंदिनी तील लिखाणातून स्पष्ट होते. या काळात देशाला मिळणारे स्वातंत्र्य ठिकाऊ आणि शाश्वत असावे यासाठी ते सतत कार्यरत राहिल्याचे दिसून येते. भारतीय संविधान निर्मितीच्या कालखंडात ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सतत संपर्कात राहिले होते.

याकाळात पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद, डॉ. राजेंद्रप्रसाद इत्यादी नेत्यांना ते भेटत असत.[१०] भारताच्या संविधान निर्मिती बरोबरच राष्ट्राची मजबूत पायाभरणी कशी होते याची जागरूकपणे सक्रियरित्या ते नोंद घेत असल्याचे त्यांची त्याकाळची दैनंदिनी आपणाला साक्ष देते. २६ नोव्हेंबर १९४९ ला भारतीय संविधान घटना समितीत संमत होत असताना ते सभागृहातील प्रेक्षागृहात उपस्थित होते.[११] या काळात देशभरातील सर्व संस्थाने भारतात विलीन होऊन देश एकसंघ व्हावा अशी त्याची मनोमन मनीषा होती. संस्थानांच्या भारतातील विलीनीकरण प्रक्रियेत बडोदा संस्थानचे विश्वासू असल्यामुळे व त्यांचा जन्म आणि वास्तव्य कोल्हापूर संस्थानचे असल्यामुळे त्यांना या प्रश्नांची तीव्रता माहित होती. आपल्या परीने संस्थानांच्या विलीनीकरण प्रक्रियेत त्यांनी सहकार्य केले होते.

भारताला स्वातंत्र्य मिळताना सातगोंडा पाटील यांच्यासारख्या त्यागी आणि जागरूक स्वातंत्र्य सैनिकांचे कार्य प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे. आज देशाला ७५ वर्षे स्वातंत्र्य मिळतानाची होत असताना त्यांच्या सारख्या असंख्य ज्ञात –अज्ञात नायकांना स्मरण करणे आपले कर्तव्य बनते.

**स्वातंत्र्यानंतर चे कार्य:**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात संविधान निर्मिती होऊन २६ जानेवारी १९५० पासून देश प्रजासत्ताक झाला. ज्याचा सातगोंडा पाटील यांना खूप मोठा आनंद झाला होता. भारताच्या संविधान निर्मितीच्या कामातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान त्यांना खूप प्रभावित करून गेले. त्या काळात ते दिल्लीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेजारी मुक्कामास असत. आंबेडकरांच्या कार्याचा मोठा ठसा त्यांच्यावर होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बौद्ध धर्म स्वीकारण्याच्या निर्णयाला त्यांचे समर्थन होते.[१२]

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जैन समाजाच्या संघटनात्मक कामात हि त्यांचा सहभाग होता. त्यांनी जैन समाजाच्या संदर्भात घटनासमितीत डॉ. आंबेडकर आणि इतर सदस्याशी समाजाच्या विषयाच्या संदर्भात चर्चा करून तत्संबंधित प्रश्न सोडविण्यात सहभाग घेतला होता. पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल इत्यादीशी त्यांनी जैन शिष्टमंडळा मार्फत चर्चा केल्या.[१३] जैन समाजाच्या एका १९५० सालच्या दिल्ली येथील कार्यक्रमाच्या आयोजनात त्यांचा सहभाग होता. पंडित जवाहरलाल नेहरू यांना कार्यक्रमास निमंत्रित करण्यात ते सहभागी होते.[१४]

सातगोंडा पाटील यांचा मृत्यू १९५८मध्ये दिल्ली येथे झाला. त्यावेळी त्यांचे कोणतेही नातेवाईक त्यांच्यासोबत नव्हते. मृत्यूपश्चात त्यांच्या पत्नी दिल्ली येथे गेल्या होत्या. त्यावेळी त्यांच्या मृत्यू शिवाय कोणतीही माहिती मिळाली नाही. मृत्यू वेळी त्यांना कोणताही गंभीर आजार नव्हता. त्यांचे पार्थिव त्यांच्या पत्नीने पहिले त्यावेळी ते निळे पडले होते. त्यामुळे त्यांचे कुटुंबिय घातपाताचा संशय व्यक्त करतात.[१५]

**मूल्यमापन:**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील विस्मृतीत गेलेले नायक सातगोंडा गिरगोंडा पाटील यांनी स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. पट्टणकोडी, ता. चिक्कोडी (कर्नाटक) येथे जन्मलेल्या आणि कोल्हापूर संस्थानात वाढलेल्या पाटील यांच्यावर त्यावेळच्या राष्ट्रवादी उत्साहाचा खूप प्रभाव होता. स्थानिक चळवळी आणि संघटनांमध्ये त्यांच्या सुरुवातीच्या सहभागाने स्वातंत्र्याच्या कारणासाठी वचनबद्धता दर्शविली.

पाटील यांनी आंदोलने आयोजित करणे, निदर्शनांचे नेतृत्व करणे आणि संस्थांनी राजवटीविरुद्ध जनतेला एकत्रित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. पाटील यांच्या विविध पार्श्वभूमी आणि प्रदेशातील लोकांशी संपर्क साधण्याच्या क्षमतेमुळे त्यांना स्वातंत्र्य चळवळीतील एक प्रभावी संयोजक आणि संघटक मानावे लागेल.

तुरुंगवास आणि वैयक्तिक त्रास सहन करूनही सातगोंडा पाटील स्वतंत्र भारताच्या प्रयत्नात स्थिर राहिले. प्रतिकूल परिस्थितीचा सामना करताना त्यांच्या निर्धाराने आणि धैर्याने इतर अनेकांना प्रेरणा दिली. पाटील यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान हे त्यांच्या संघर्षादरम्यानच्या कृतींपुरते मर्यादित नव्हते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही त्यांनी सामाजिक न्यायाची वकिली केली आणि समाजाच्या भल्यासाठी काम केले. पाटील यांचा वारसा भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या असंख्य गायब वीरांची आठवण करून देणारा आहे आणि त्यांची कथा भारताच्या समृद्ध इतिहासाचा अविभाज्य भाग म्हणून ओळखली जावी.



बड़ौदा के महाराजा के साथ श्री शिरगूरकर पाटील साहब



BY REGISTERED POST

No. 416/1932 of 1973
K.P. Prison Office, Kalamba
Dated the 26th March 1973

IMPRISONMENT CERTIFICATE

THIS IS TO CERTIFY THAT SHRI Satgonda Girgonda Patil No. 327 aged 30 years of Shirgur Taluka Raibag and District Karvir was admitted to the Central/District Prison on 22nd Dec. 1939 for taking part in civil disobedience movements.

He was sentenced to/~~Detained~~ Two (2) years R. I./S./I. for one (1) year & three (3) month under section 406, 4/124 A-IPC by the Magistrate, First Class, Pete Hatkanangale & Shirol on 22nd Dec 1939. Out of the period of abovementioned imprisonment Shri ........ was granted remission in sentence to the extent of ........ days.

He was detained as an undertrial prisoner from the ........ to the ........

He was subsequently ~~transferred to~~/released on 18th Dec. 1940 from this prison on ........ to undergo his remaining period of his imprisonment.

IDENTIFICATION MARKS

(1) This record is
(2) not forthcoming
(3)

Superintendent
Kolhapur District Prison,
KALAMBA.

To
Shrimati Hansadevi Satgonda Patil (Shirgur)
184/5131 Kannamwar Nagar, Vikroli, Bombay 83 East

With reference to his/her application dated 29-12-72



सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सन्मान पत्र

श्री. सातगोंडा गिरगोंडा पाटील. यांना त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामांत केलेल्या कामगिरीच्या गौरवार्थ हे सन्मानपत्र देण्यांत येत आहे.

सचिवालय
मुंबई.
दिनांक

वसंत नाईक
मुख्य मंत्री
महाराष्ट्र राज्य



No. 33/94/50-PM5
PRIME MINISTER'S SECRETARIAT
NEW DELHI

31st January, 1950

Dear Sir,

With reference to the deputation of certain representatives of the Jains, who met the Prime Minister on the 25th January, I am desires to say that there is no cause whatever for the Jains to have any apprehensions regarding the future of their religion and community. Your deputation draw attention to Article 25, Explanation II, of the Constitution. This Explanations only lays down a rule of constitution for the limited purposes of one provision in the article, and, as you will notice, it mentions not only Jains, but also the Buddhists and the Sikhs. It is clear that Buddhist are not Hindus, Therefore, There is no reason of thinking that Jains are considered as Hindus. It is true that Jains are in some ways closely allied to Hindus and have many customs in common; but there can be no doubt that they are a distinct religious community and the constitution does not in any way affect this well-recognised position.

Yours faithfully,
AVPai
(A.V. Pai.)
Principal Private Secretary
to the Prime Minister.

Shri S.G. Patil,
Representative of Jains Deputation,
10, Centrel Court, New Delhi.

केंद्रीय प्रधानमंत्री भारतमुकुट
श्री पं. जवाहरलाल नेहरूजीका
जैन समाजको पत्र.
(पिछले पृष्ठ पर मुद्रित इस पत्र को साफ पढ़ने हेतु पुनः टंकित किया गया है)
( १८२ )




**संदर्भ :**

1. सातगोंडा गिरगोंडा पाटील यांच्या जयसिंगपूर येथील स्नुषा श्रीमती प्रभा यशोधन पाटील –शिरगुरकर यांची मुलाखत
2. सातगोंडा गिरगोंडा पाटील यांच्या जयसिंगपूर येथील स्नुषा श्रीमती प्रभा यशोधन पाटील –शिरगुरकर यांची मुलाखत

3. सातगोंडा गिरगोंडा पाटील यांच्या जयसिंगपूर येथील स्नुषा श्रीमती प्रभा यशोधन पाटील –शिरगुरकर यांची मुलाखत
4. सातगोंडा गिरगोंडा पाटील यांच्या जयसिंगपूर येथील स्नुषा श्रीमती प्रभा यशोधन पाटील –शिरगुरकर यांची मुलाखत
5. सातगोंडा गिरगोंडा पाटील यांच्या जयसिंगपूर येथील स्नुषा श्रीमती प्रभा यशोधन पाटील –शिरगुरकर यांच्याकडील फोटो अल्बम
6. सातगोंडा गिरगोंडा पाटील यांची दैनंदिनी.
7. महाराष्ट्र शासनाच्या कळंबा (कोल्हापूर) येथील कारागृहाचे अधीकृषक यांचे 26 मार्च 1973 रोजीचे प्रमाणपत्र
8. महाराष्ट्र शासनाच्या कळंबा (कोल्हापूर) येथील कारागृहाचे अधीक्षक यांचे 26 मार्च 1973 रोजीचे प्रमाणपत्र
9. सातगोंडा गिरगोंडा पाटील यांची दैनंदिनी.
10. सातगोंडा गिरगोंडा पाटील यांची दैनंदिनी.
11. सातगोंडा गिरगोंडा पाटील यांची दैनंदिनी.
12. सातगोंडा गिरगोंडा पाटील यांची दैनंदिनी.
13. 31 जानेवारी 1950 रोजीचे पंतप्रधान कार्यालयाचे पत्र आणि अनुषंगिक फोटो
14. सातगोंडा गिरगोंडा पाटील यांच्या जयसिंगपूर येथील स्नुषा श्रीमती प्रभा यशोधन पाटील –शिरगुरकर यांच्याकडील फोटो अल्बम
15. सातगोंडा गिरगोंडा पाटील यांच्या जयसिंगपूर येथील स्नुषा श्रीमती प्रभा यशोधन पाटील –शिरगुरकर यांची मुलाखत